# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६/२०१२-१३/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आबासो रामू सरगर,<br>मु.पो. वशाण, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री आबासो रामू सरगर, मु.पो. वशाण, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. १२.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार यांनी आपली शेती गट क्र. १३३/२ मध्ये ३ अश्वशक्ती नवीन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी चलन दि. २१.११.२००७ रोजी रु. ३३/- पावती क्र. ४१७०४५६ व रु.१५००/- पावती क्र. ४१७०४५७ नुसार भरले व चाचणी अहवालही दिला आहे. त्यांना विद्युत पुरवठा घेणेसाठी एका डांबाची आवश्यकता आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार हा वीज पुरवठा लाईन कमी लागत असलेने केबलवर घ्यावा असे वि.प.च्या अधिकाऱ्यांनी तोंडी सांगितले आहे. तक्रारदार ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २०.१२.२०११ रोजी तक्रार दाखल केली. त्यामध्ये दि. १७.२.२०१२ रोजी कक्षाने आदेश पारीत करुन वीज पुरवठा देण्याचे आदेश केले आहेत. मंचाकडून अपेक्षित मदत - एका निर्देशित कालावधीत वीज जोडणी देणेचा आदेश व्हावा. ग्राहकाने तक्रारीसोबत ७/१२ उतारा व चलन भरलेची पावती जोडली आहे. चाचणी अहवाल दिल्याची पोच जोडलेली नाही.

वितरण कंपनीने आपल्या दि. २.५.२०१२ च्या लेखी अहवालात गाहकाने शेतीपंप वीज जोडणीसाठी चलन दि. २१.११.२००७ रोजी भरल्याचे मान्य आहे, परंतु विद्युत संच मांडणी करुन त्याचा चाचणी अहवाल सादर केलेला नव्हता. ग्राहकाला चाचणी अहवाल देण्याबाबत लेखी व तोंडी सूचना देऊनही चाचणी अहवाल सादर केलेला नाही. त्यांचा जत ग्रामीणच्या यादीमध्ये १४९ क्रमांक होता. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार शेवटची नोटीस जा.क्र. १८२५ दि. १५.४.२०१० रोजी दिलेली होती, तरीसुध्दा अर्जदार ग्राहकाने चाचणी अहवाल सादर केलेला नाही. म्हणून त्यांचे नावसुध्दा रद्द करण्यात आले असून त्यांना कनेक्शन देण्यात आले नाही असे म्हटले आहे. तसेच वरील गोष्टींचा विचार करुन नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ९.५.२०१२ ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार ग्राहक गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वितरण कंपनीचे अधिकारी श्री. मैलापुरे, सहाय्यक अभियंता व श्री. अे.एस.भोसले, सहाय्यक अभियंता उपस्थित. त्यांनी ग्राहकाने चलन भरल्याचे मान्य केले. ग्राहकास नोटीस देवूनही चाचणी अहवाल सादर केला नाही. ग्राहकास नोटीस दिल्याबद्दलचा पुरावा दि. ३१.५.२०१२ पर्यंत मंचासमोर दाखल करतो असे सांगितले, परंतु दि. ४.६.२०१२ पर्यंत ग्राहकास चाचणी अहवालाबद्दल लेखी कळविल्याचे किंवा नोटीस दिल्याची कागदपत्रे मंचासमोर हजर केली नाहीत.

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे ठराविक मुदतीत वीज जोडणी देण्याचे आदेश करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार तक्रारदार यांनी आपली शेती गट क्र. १३३/२ मध्ये ३ अश्वशक्ती नवीन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी चलन दि. २१.११.२००७ रोजी चलन भरल्याचे मान्य आहे. ग्राहकाने तक्रारीमध्ये चाचणी अहवाल दिला असल्याचे म्हटले आहे परंतु त्याबाबतचा कुठलाही पुरावा, पावती किंवा चाचणी अहवालाची प्रत जोडलेली नाही. वि.प.ने लेखी तोंडी सूचना देऊनही ग्राहकाने चाचणी अहवाल सादर केला नाही असा बचाव घेतला आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

मंचासमोरील सुनावणीनंतर मैलापुरे यांनी मागितलेल्या मुदतीत नोटीस दिल्याचा कुठलाही पुरावा हजर केला नाही. तक्रारदार ग्राहकास वीज जोडणी देण्यास विलंब झालेला आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट दिसते. विद्युत पुरवठा घेणेसाठी एका डांबाची आवश्यकता आहे. हा वीज पुरवठा केबलवर घ्यावा असे वि.प.च्या अधिकाऱ्यांनी तोंडी सांगितले ही बाब वि.प.ने स्पष्टपणे नाकारलेली नाही. अंतर्गत कक्षाने विद्युत पुरवठा करण्यात येईल असे मोघम आदेश केले आहेत. वि.प.ने आपल्या बचावात ग्राहकाला चाचणी अहवाल देण्याबाबत लेखी व तोंडी सूचना देऊनही चाचणी अहवाल सादर केलेला नाही. त्यांचा जत ग्रामीणच्या यादीमध्ये १४९ क्रमांक होता. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार शेवटची नोटीस जा.क्र. १८२५ दि. १५.४.२०१० रोजी दिलेली होती, तरीसुध्दा अर्जदार ग्राहकाने चाचणी अहवाल सादर केलेला नाही. म्हणून त्यांचे नावसुध्दा रद्द करण्यात आले असून त्यांना कनेक्शन देण्यात आले नाही असे म्हटले आहे. ग्राहकाने चाचणी अहवाल दिला नाही केवळ या एकाच कारणावरुन वीज जोडणी देण्यास झालेला विलंब क्षम्य होणार नाही. विद्युत कायदा २००३ कलम ४३ नुसार ग्राहकाचा अर्ज परिपूर्ण असेल तर त्यांस वीज जोडणी देणे आवश्यक आहे. या ठिकाणी १ डांबाची आवश्यक आहे म्हणजे वितरण वाहिनी विस्तार असल्याने ग्राहकास साधारणपणे २१ फेब्रुवारी २००८ पर्यंत वीज जोडणी देणे आवश्यक होते. त्यानंतर जवळजवळ २ वर्षांनंतर तक्रारदारास नोटीस जा.क्र. १८२५ दि. १५.४.२०१० रोजी देण्यात आली आहे. अंतर्गत कक्षापुढे या बाबींचा उल्लेख केल्याचे दि. १७.२.२०१२ च्या आदेशात दिसत नाही. अंतर्गत कक्षाने तक्रारदारास विद्युत पुरवठा लवकरच नियमानुसार करण्यात येईल असा मोघम आदेश केला आहे. ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५ कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश वि.प.ला देऊ शकतो. या ठिकाणी ग्राहकाच्या विद्युत पुरवठ्यासाठी १ डांबाची आवश्यकता आहे. अंतर्गत कक्षाचे आदेश दि. १७.२.२०१२ ला होऊन जवळजवळ ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला तरी तक्रारदार ग्राहकास विद्युत पुरवठा दिला नाही. त्यामुळे मंचाचे असे मत झाले आहे की, प्रस्तुत ग्राहकास त्वरित दि. ३१.७.२०१२ पर्यंत वि.प.ने वीज जोडणी द्यावी व त्याचा अहवाल मंचास द्यावा. ग्राहकाने आपल्या तक्रारीत एका निर्देशित कालावधीत वीज जोडणी द्यावी ही मागणी मान्य करण्यात येत आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी जत उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास दि. ३१.७.२०१२ (अेकतीस जुलै दोन हजर बारा) पर्यंत गट क्र. १३३/२ मध्ये ३ अश्वशक्ती नवीन शेतीपंप वीज जोडणी द्यावी व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com